तिसऱ्या सहस्त्रकारंभी

# भारतीय नाट्य आणि नाटककार

संपादक :
प्रा. विनय मडगांवकर



गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP)
आणि शासकीय महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने
आयोजित राष्ट्रीय परिसंवादात सादर केलेल्या शोधनिबंधांचा संग्रह

गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP) आणि
शासकीय महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
राष्ट्रीय परिसंवादात सादर झालेल्या शोधनिबंधांचा संग्रह

## तिसऱ्या सहस्रकारंभी

# भारतीय नाट्य आणि नाटककार

**संपादक**
प्रा. विनय मडगांवकर
मराठी विभाग
गोवा विद्यापीठ

**प्रकाशक**
संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन
अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय
गोवा विद्यापीठ
ताळगाव-गोवा

# तिसऱ्या सहस्त्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार
**Tisaṟyā sahasrākārambhī bhāratīya nāṭya 'āṇi nāṭakakāra**

**संपादक :** प्रा. विनय मडगांवकर
मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ, ताळगाव-गोवा.
संपर्क : ८३०८४७७६६४
vinay@unigoa.ac.in

© **प्रकाशक :** संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन
अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय (VRPP)
गोवा विद्यापीठ, ताळगाव-गोवा

**प्रकाशन क्रमांक : ०१**
प्रथम आवृत्ती : १५ ऑगस्ट २०२१

**ISBN : 978-93-5493-269-4**

**मुद्रक :** अथर्व एन्टरप्रायजेस, अस्नोडा, बारदेश - गोवा.


**मुखपृष्ठ :** गणेश हाडके

**मूल्य :** रुपये २००/-

**विशेष सहकार्य:**
'तिसऱ्या सहस्त्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' हे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी गोवा विद्यापीठाच्या संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासनाचे (VRPP) आर्थिक सहकार्य प्राप्त झाले आहे.

***सूचना :*** *या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधात लेखकांनी स्वतःची मते मांडली आहेत. त्या सर्व मतांशी संपादक व प्रकाशन संस्था सहमत असतील असे नाही.*

# अर्पण पत्रिका



गोमंतकीय संतकवी नाटककार

**कृष्णंभट बांदकर**

यांना सादर समर्पित

# अनुक्रमणिका


**भारतीय नाटक आणि नाटककार**
- प्रेमानंद गज्वी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १३

**मालवणी नाटक व मराठी नाटक यांचा अनुबंध**
- डॉ. बाळकृष्ण लळीत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २३

**कोंकणी विनोदी नाटक : दशा आणि दिशा**
- डॉ. राजय पवार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३२

**'तिसऱ्या सहस्रकातील गुजराती रंगभूमी' : एक संक्षिप्त आलेख**
- डॉ. करंदीकर संजयकुमार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ४०

**एकविसाव्या शतकातील हिंदी नाटक**
- डॉ.रमिता गुरव . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ४३

**कन्नड पथनाट्य आणि वर्तमान समस्या**
- डॉ. प्रभा वी. भट् . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५०

**तिसऱ्या सहस्रकारंभी कोंकणी नाटक आणि नाटककार**
- डॉ. प्रकाश वजरीकार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५७

**तिसऱ्या सहस्रकारंभी गोमंतकीय मराठी नाटक**
- सारिका आडविलकर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६१

**तिसऱ्या सहस्रकारंभी 'कोंकणी तियात्र'**
- डॉ. कॉज्मा फेर्नांडीस . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६९

**'२१ व्या शतकातील कोंकणी एकांकिका : स्वरूप आणि समीक्षा'**
- डॉ. हनुमंत चोपडेकर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ७५

**सामाजिक आशयाचे पौराणिक नाटक 'अश्वत्थामा हत: '?'**
- डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ८६

**ऐतिहासिक महानाट्यांचा विषय 'छत्रपती शंभूराजे'**
- प्रा. विनय मडगावकर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ९८

**श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या २००० नंतरच्या नाट्यसंहिता**
- देविदास शंकर आमोणकर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १०५

**विठ्ठल गावडे यांच्या सामाजिक नाट्यसंहिता**
- प्रा. सोनिया सावंत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ११८

**समकालीनांना खुणावणारी, भासाची अभिजात नाटके**
- प्रा. अनघा देशपांडे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १२७

**मराठी नाटकांचे चित्रपटात माध्यमांतर**
- उर्वी भट . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १३९

Professor Varun Sahni
Vice-Chancellor

**Goa University**



## <u>Message</u>

I am delighted to learn that the Directorate of Visiting Research Professor's Programme has published a book titled 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' (Indian Play and Playwrights in the Commencement of Third Millennium) edited by Shri Vinay Madgaonkar, Assistant Professor, Department of Marathi. This book contains papers presented by various scholars from Gujarat, Maharashtra, Goa and Karnataka of Indian plays in different languages during the National Seminar organised by Sant Sohirobanath Ambiye Chair under the Directorate of Visiting Research Professor's Programme in collaboration with Government College of Art, Science and Commerce, Quepem-Goa in February 2018.

'Natya' (नाट्य) is an innovative work of performance art, inspired by the cultural depiction of human emotions. The form of play varies depending upon the language in which the play is written. 'Drama' (नाटककार) as a form of literature has been included in the curriculum of various languages and literature studies at the College and University level.

I congratulate the Directorate of Visiting Research Professor's Programme for publishing the book and Shri Vinay Madgaonkar for editing the book 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार'. I am sure the book will benefit researchers, scholars and students.

Varun Sahni

P. O. Goa University, Taleigao Plateau, Goa 403 206, India
Phone: +91 8669609001/02 (O) +91 832 2451075 (O) +91 9850300004 (R), Fax: +91 (0) 832 2451184, email: vc@unigoa.ac.in

# प्रकाशकाचे मनोगत

'नाटक' हा गोमंतकीयांच्या जिव्हाळ्याचा विषय, स्वादिष्ट शीत-कडी सारखा. म्हणूनच तर गोव्याच्या खेड्यापाड्यातील मंदिरात दरवर्षी विविध जत्रा-उत्सवानिमित्त शेकडो नाट्यप्रयोग सादर होतात. काही दिवसांपूर्वी मी मोरजीच्या समुद्रकिनाऱ्यावर कोळी बांधवांबरोबर गप्पागोष्टी करत होते. हे कोळी बांधव दिवसा तसेच रात्री-अपरात्री आपल्या होड्या घेऊन उफाळत्या समुद्रावर स्वार होतात. जाळी पाण्यात फेकून कित्येक तासन्तास ते होडीमध्ये घालवतात. तेथेच त्यांच्या गप्पा रंगतात, मनोरंजनासाठी गायन होतं आणि काही वेळा खोल समुद्रात किनाऱ्यापासून दूर असलेल्या नावेमध्ये त्यांच्या नाटकाची तालमी सुद्धा होतात. चंद्राच्या शीतल चांदण्यात, अथांग सागरात अलगद तरंगणाऱ्या नावेवर, हौशी कलाकारांच्या नाटकाची तालीम होते. हे दृश्य विलोभनीय तथा अनुपम असले, तरी खोल समुद्रात 'जलदिव्य' केल्यासारखे फारच रोमांचकारी धाडसाचे होते. गोमंतकीयांना नाट्यवेडे का म्हणतात या प्रश्नाचे उत्तर मला इथे मिळाले.

भारतीय समाजाचे रंजन आणि प्रबोधन करणाऱ्या 'नाटक' या सर्जनशील साहित्य प्रकाराचे यथोचित संशोधन व्हावे, या उद्देशाने शासकीय महाविद्यालय केपे आणि गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यसन यांनी 'तिसऱ्या सहस्त्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादात अभ्यासक आणि संशोधकांनी 'भारतीय नाट्य आणि नाटककार' या विषयावर शोधनिबंध प्रस्तुत केले.

नाट्यक्षेत्रातील अभ्यासक, शिक्षक आणि संशोधक यांना उपयुक्त ठरणारे हे शोधनिबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहेत.

अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालयातर्फे मनःपूर्वक शुभकामना.

**डॉ. सविता केरकर**
संचालक,
अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय,
गोवा विद्यापीठ, गोवा.

# संपादकीय

मराठी साहित्यविश्वात नाटकाच्या प्रस्तुतीकरणाच्या गुणधर्मामुळे विशेष स्थान प्राप्त झाले आहे. तेराव्या शतकात संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीतील पहिल्या अध्यायात श्रीगणेशाचे स्तवन करताना 'काव्यनाट्याचा' उल्लेख केला आहे. "देखा काव्य नाटकां । जिं निर्धारिता सकौतुका । तियाचि रुणझुणती क्षुद्र घंटिका । अर्थध्वनि ॥१.७॥" ज्ञानदेवांनी काव्यनाट्यास मंगलमुर्ती गणरायाच्या लहान मंजूळ सोनेरी घंटिकांची उपमा दिली आहे. संत एकनाथांच्या एकनाथी भागवताआधी गोमंतकीय कवी कृष्णदास शामा यांनी रचलेल्या 'श्रीकृष्णचरित्रकथा' या ग्रंथात सत्याचा आभास निर्माण करणाऱ्या नाटकाचे "जैसा येकादा नाटकी देखा । न्हवे ते दाखवि लोकां ॥१२.५८॥" असे यथार्थ वर्णन केले आहे. वास्तविक 'नाट्य' हे बहुतांशी विश्वाचीच मनोरम प्रतिकृती असते. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार नाटक म्हणजे जीवनाची अनुकृती आहे. परमेश्वर संपूर्ण सृष्टीची निर्मिती करतो, तर नाटककार नाट्यसृष्टीची निर्मिती करतो. विलोभनीय रंगांनी सुशोभित झालेली निसर्गसृष्टी आणि नाटकातील आभासी प्रतिसृष्टी, या दोन्ही मध्ये 'रंगांना' विशेष महत्त्व आहे. नाट्यारंभी नांदीच्या माध्यमाने 'रंगदेवतेला' अभिवादन करून 'रंगसंहितेच्या' साहाय्याने 'रंगसूचनांचे' पालन करत 'रंगकर्मी' कलाकार आपल्या अभिनय कौशल्याने 'रंगभूमीवर' आल्हाददायी 'नाट्यरंगांचा' आविष्कार करतो. त्यात जेव्हा तो स्वतः 'रंगून' जातो, तेव्हा नाटकालाही 'रंग' चढतो.

रंजनाबरोबर प्रसंगी प्रबोधन करणाऱ्या अशा या 'नाट्य' विषयाचा समावेश महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावरील विविध भाषा आणि साहित्य अध्ययनाच्या अभ्यासक्रमात केलेला आहे. या विषयांवर पी. एच. डी. साठी संशोधन सुरू आहे. गोवा कला अकादमीचे नाट्य महाविद्यालय प्रगतीपथावर आहे. भारतीय नाट्यात कालपरत्वे स्थित्यंतरे होत राहिली. त्यांचा वेध घेत संशोधन करण्याच्या उद्देशाने गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP) आणि शासकीय महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ आणि २० फेब्रुवारी २०१८ रोजी केपे येथील महाविद्यालयाच्या सभागृहात 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद आयोजित केला होता. प्रस्तुत परिसंवादात अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर करण्यात आले. संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना उपयुक्त असणारे हे शोधनिबंध ग्रंथरूपाने प्रकाशित झाल्याने सर्वांनाच लाभदायी ठरणार आहे.

प्रस्तुत परिसंवादात भारतीय नाटककारांबरोबर भारतीयांनी अनुवादित, रुपांतरीत केलेल्या युरोपीय नाट्यकृतींचाही समावेश केला आहे. पाश्चात्य नाटककार शेक्सपियरने तर जगालाच रंगमंच मानले होते. त्याच्या मते “All the world's a stage, and all the men and women merely players." भारतीय नाटककार नानासाहेब शिरगोपीकर यांनी विश्वनिर्माता परमेश्वराला 'जगत रंगमंदिराचा रंगनाथ' मानून नाट्यारंभी नांदीच्या माध्यमाने वंदन केले आहे. त्यांची “विश्वनाट्य सूत्रधार | तूच श्याम सुंदरा || चातुरी तुझी अगाध कमलनयन श्रीधरा || कुंचला तव करात तरीही तूच रंगनाथ | अमीट रंग अर्पितोस जगत रंगमंदिरा ||” ही रचना अर्थपूर्ण आहे. प्रज्ञावंत मानवाच्या कृतीमुळे सृष्टीचे सौंदर्य पालटले असले, तरी त्याचा सूत्रधार परमेश्वरच आहे, हीच भावना नानासाहेब शिरगोपीकर यांनी नांदीत शब्दबद्ध केली आहे.

'रंगदेवतेला' विनम्र अभिवादन करणे, हे भारतीय नाट्यसृष्टीचे विशेष आहे. भरताच्या नाट्यशास्त्रातील अध्याय ५ श्लोक १०५-१०८ यात वर्णन केलेले नांदीचे स्वरुप लक्षवेधी आहे. नाटकाच्या शुभारंभी देवस्तुती, प्रार्थना आणि शुभाशीर्वचन यांच्यासह राजा, राष्ट्र, कवी आणि प्रेक्षक यांच्या हितचिंतनाची आणि अभिवृद्धीची प्रार्थना अनुस्यूत असते. त्यात किंचित बदल करून गोमंतकीय नाट्यप्रयोगाच्या आरंभी देवदेवतांना वंदन करणारी नांदी प्रस्तुत केली जाते आणि नाटकाच्या शेवटी अनेक ठिकाणी 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गानाने सांगता होते. अशा गोमंतकीय रंगभूमीचा परिचय करून देणारे निवडक शोधनिबंध या परिसंवादात सादर करण्यात आले.

'नाटक' हा मानवी भावनांचा सांस्कृतिक अविष्कार आहे. त्यामुळे 'नाट्य' हे ज्या समाजात, प्रांत-प्रदेशात अवतरते, ते तेथील संस्कृतीचे प्रतीकरूप घेऊनच साकार होते. त्यामुळे भारतातील भिन्न प्रांत-प्रदेश तसेच समाज आणि संस्कृती यांच्या प्रभावामुळे नाटकाची रूपेही भिन्नभिन्न संभवतात. भारतीय नाट्यातील अशा वैविध्याचा परामर्श या राष्ट्रीय परिसंवादात घेतला गेला. प्रस्तुत शोधनिबंध संग्रहातील 'तिसऱ्या सहस्त्रकातील गुजराती रंगभूमी' या अभ्यासपूर्ण शोधनिबंधात डॉ. संजयकुमार करंदीकर यांनी गुजराती नाटकांचा संशोधनात्मक संक्षिप्त आलेख उत्तमरीत्या मांडला आहे. 'एकविसाव्या शतकातील हिंदी नाटक' या शोधनिबंधात डॉ. रमिता गुरव यांनी हिंदी नाट्यविश्वाचे यथायोग्य साधार विश्लेषण केले आहे. डॉ. बाळकृष्ण लळीत यांच्या 'मालवणी नाटक व मराठी नाटक अनुबंध' या शोधनिबंधातील तुलनात्मक अध्ययन लक्षवेधी आहे. 'तिसऱ्या सहस्त्रकारंभी

गोमंतकीय मराठी नाटक' या मुद्देसुद शोधनिबंधात प्रा. सारिका आडविलकर यांनी गोमंतकीय मराठी नाट्यविश्वाचा यथोचित परिचय घडवला आहे.

'गोमंतकीय कोकणी नाटक' या विषयावरील डॉ. प्रकाश वजरीकर यांच्या शोधनिबंधात गोमंतकीय कोकणी नाटकाच्या विविध अयामांचा अभ्यासपूर्ण विचार केलेला दिसून येतो. तिसऱ्या सहस्रकारंभी 'कोंकणी तियात्र' हा डॉ. कॉज्मा फेर्नांडीस यांचा 'तियात्र' या नाट्यप्रकारावरील शोधनिबंध वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'कोंकणी विनोदी नाटक : दशा आणि दिशा' या विषयावर डॉ. राजय पवार यांनी चिकित्सात्मक विवेचन केले आहे. डॉ. हनुमंत चोपडेकर यांनी '२१व्या शतकातील कोंकणी एकांकिका' या नाट्यप्रकाराचे स्वरूप आणि झालेली समीक्षा' यांचा समर्पक परामर्श घेतला आहे. डॉ. शैलेश त्रिभुवन यांचा शोधनिबंध 'मराठी पौराणिक नाटक', प्रा. विनय मडगावकर यांचा 'ऐतिहासिक महानाट्यांचा विषय : छत्रपती शंभूराजे', प्रा. उर्वी भट यांचा 'मराठी नाटकाचे चित्रपटात माध्यमांतर', हे शोधनिबंध नाट्यविषयाच्या नव्या स्थित्यंतरांचा परिचय करून देणारे आहेत.

नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि प्रेक्षक यांच्या परस्पर सहयोगातून सिद्ध होणारे 'नाट्य' ही सांघिक प्रेरणेतून साकार होणारी नाविन्यपूर्ण कलाकृती असते. नाटककार आपल्या कल्पनेने नाटकाची शब्दसंहिता निर्माण करतो. दिग्दर्शक संभाव्य सादरीकरणासंदर्भात आपली कल्पना मांडतो. शेवटी रंगभूमीवरील कलाकार 'नाटक' या साहित्यप्रकाराचे रुपांतर सादरीकरणाद्वारे आविष्कारामध्ये करतात. रंगभूमीवर प्रस्तुत होणारी नाट्यसंहिता, ही दिग्दर्शकाच्या कल्पनेतून कलाकारांच्या माध्यमाने साकार होणारी चैतन्यमय नवनिर्मिती असते. एखादी नाट्यसंहिता अनेकविध प्रयोगांमध्ये सादर करण्यास सक्षम असणे, हे त्या संहितेच्या श्रेष्ठतेचे लक्षण असते. प्रस्तुत परिसंवादात अभ्यासकांनी काही नाटककारांच्या साहित्यकृतींवर शोधनिबंध सादर केले. गोमंतकीय नाटककारांपैकी 'विष्णू सुर्या वाघ यांच्या नाट्यसंहिता' या विषयावर देविदास शंकर आमोणकर यांनी विवेचन केले. 'विठ्ठल गावडे यांच्या सामाजिक नाट्यसंहिता' या विषयावर प्रा. सोनिया सावंत यांनी केलेले सादरीकरण अभ्यासपूर्ण होते.

तिसऱ्या सहस्रकारंभी काही जुन्या नाट्यसंहितांचाही शोध घेऊन त्या रंगमंचावर सादर केल्या गेल्या. भास यांच्या 'स्वप्न वासवदत्ता' या संस्कृत नाटकाचा प्रा. अनघा देशपांडे यांनी मराठीत अनुवाद करून उत्कृष्ट प्रशंसनीय प्रयोग सदर केले. याच विषयावरील त्यांचा शोधनिबंध अभ्यासनीय आहे. गोमंतकीय संतकवी कृष्णंभट बांदकरांच्या नाट्यसंहिता पुन्हा नव्या उत्साहाने प्रस्तुत केल्या गेल्या. संत

कृष्णंभट बांदकर यांचा अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्यावर झालेल्या प्रभावासंदर्भात ज्येष्ठ संशोधक रा. चिं. ढेरे यांनी 'भारतीय रंगभूमीच्या शोधात' या ग्रंथात मांडलेले मत लक्षवेधी आहे. त्यांनी लिहिले आहे की, " कृष्णंभट बांदकरांसारख्या प्रतिभासंपन्न भक्तकवीची नाट्यकविता अभिनित झालेली पाहताना अण्णांचे नाट्यवेडे मन भारावले होते. नाट्यात्मक पुराणप्रसंगाची मोहिनी त्यांना जाणवली होती." संत कृष्णंभट बांदकरांच्या पारंपरिक पौराणिक रंगभूमीची बलस्थाने जाणून घेऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी मराठी संगीत नाट्यनिर्मितीला प्रारंभ केला. अशा संत कृष्णंभट बांदकरांच्या 'संगीत अहिल्योद्धार' नाटकाचे दर्जेदार प्रस्तुतीकरण विजयकुमार नाईक आणि त्यांच्या सर्व रंगकर्मी सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या केले. युवा संगीतकार अजय नाईक यांनी या नाटकातील नाट्यगीतांना उत्तमरीत्या संगीतबद्ध केले. गोमंतकीय आद्य स्त्री नाटककार हिराबाई पेडणेकर यांनी १९०३ साली लिहिलेले आणि त्याकाळात कधीच मंचित न झालेले 'संगीत जयद्रथ विडंबन' हे नाटक, शंभर वर्षानंतर २०२० मध्ये श्री. नाईक यांच्या प्रयत्नामुळे प्रथमतः प्रेक्षकांसमोर सादर झाले.

'भारतीय नाटक आणि नाटककार' यांच्या संदर्भात जेष्ठ नाट्यलेखक प्रेमानंद गज्वी यांनी स्वानुभवाच्या आधारे अधिकारवाणीने 'भारतीय नाटक आणि नाटककार' या विषयावर भाष्य केले आहे. भारतीय नाट्याविषयी विवेचन करत असताना, "ज्या तऱ्हेनं शेक्सपिअर आपल्याकडे आला, इब्सेन किंवा ब्रेख्त आला, तसा आपल्याकडील एकही नाटककार जगभर का नाही गेला?" असा प्रश्न उपस्थित करून ते भारतीय नाटककारांना त्याचबरोबर अभ्यासकांनाही सखोल आत्मचिंतन करायला प्रवृत्त करतात. यावरील उपय-योजनेसंदर्भात त्याच निबंधाच्या शेवटी त्यांनी केलेले मार्मिक विवेचन भारतीय नाटककारांना तसेच अभ्यासकांनाही मार्गदर्शक ठरणारे आहे.

प्रस्तुत शोधनिबंध संग्रह प्रकाशित करण्यासाठी अनेक मान्यवरांनी आम्हाला सहकार्य केले. प्रथमतः गोवा विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू प्रो. डॉ. वरुण साहनी यांची मी कृतज्ञता व्यक्त करतो. तत्कालीन कुलसचिव डॉ. वाय. व्ही. रेड्डी तसेच विद्यमान प्रभारी कुलसचिव डॉ. राधिका नायक यांचे मी आभार मानतो. गोवा विद्यापीठाच्या (VRPP) अतिथी प्राध्यापक संशोधक संचालनालयाचे प्रशंसनीय कार्य करणारे तत्कालीन संचालक प्रा. रामराव वाघ यांच्या समर्पक सहकार्यामुळे 'तिसऱ्या सहस्त्रकारंभी भारतीय नाट्याचे विविध आयाम दर्शवणारा राष्ट्रीय परिसंवाद' उत्तमरित्या संपन्न झाला. केपे येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान

शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉयदीप भट्टाचार्य, महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. अशोक मणगुतकर या सर्वांच्या प्रेमळ आणि सौजन्यशील सहकार्यामुळे हा परिसंवाद संस्मरणीय ठरला. राष्ट्रीय परिसंवादात सहभागी झालेले सर्व सत्राध्यक्ष आणि शोधनिबंध वाचक यांच्या प्रसंगोचित विचारमंथनातून साकार झालेला हा शोधनिबंधांचा संग्रह नाट्य अभ्यासक, शिक्षक तसेच संशोधक यांना निश्चितपणे लाभदायी ठरणार आहे.

प्रस्तुत ग्रंथ प्रकाशनाच्या प्रक्रियेत अतिथी प्राध्यापक संशोधक संचालनालयाच्या विद्यमान संचालक डॉ. सविता केरकर (VRPP) यांनी दर्शवलेल्या सौजन्याबद्दल आणि केलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP) चे कर्मचारी - नंदेश नाईक, अभिजित फोवकर, तांत्रिक सहकार्य करणारे सचिन संभाजी, नितीन पाटील आणि सचिन पाटील, पुस्तकाचे कलात्मक मुखपृष्ठ तयार करणारे तथा मुद्रक गणेश हाडके या सर्वांची मी कृतज्ञता व्यक्त करतो.

**प्रा. विनय मडगावकर**
मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ.